पोलीस आयुक्तालय, नवी मुंबई

प्रेसनोट

CB 03/2025

गुन्हे शाखा, नवी मुंबई दिनांक १३/०१/२०२६

**''गावठी दारू तयार करणाऱ्या हातभट्टीचा अड्डा गुन्हे शाखेतील पोलीसांनी केला उध्वस्त''**

पोलीस आयुक्त, नवी मुंबई, श्री.मिलिंद भारंबे, पोलीस सह आयुक्त, श्री.संजय येनपुरे, अपर पोलीस आयुक्त, गुन्हे, श्री.दीपक साकोरे, पोलीस उप आयुक्त, गुन्हे शाखा, श्री.सचिन गुंजाळ यांनी नवी मुंबई पोलीस आयुक्तालयाचे परिसरात अवैधरित्या देशी विदेशी दारू निर्मिती, विक्री करणाऱ्या इसमांवर कायदेशीर कारवाई करण्याचे आदेश दिले आहेत.

त्याअनुषंगाने अनैतिक मानवी वाहतुक प्रतिबंध कक्षाचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री. पृथ्वीराज घोरपडे यांना मिळालेल्या गोपनिय बातमीच्या अनुषगांने पथक तयार केले. मिळालेल्या बातमीप्रमाणे पोलीस पथकास शेलघर गाव, स्मशानभुमीच्या मैदानापासुन आश्रम शाळेकडील रोडच्या, डोंगरावर असलेल्या झाडांमध्ये चार संशयीत इसम हे विनापरवाना अवैधरित्या गावठी दारू निर्मिती करत असताना मिळून आले. पोलीस पथकाने त्यांना ताब्यात घेवुन त्यांचे नाव व पत्ता विचारले असता त्यांनी त्यांची नावे १)जयंत रमेश भगत, वय ४० वर्षे, धंदा– व्यवसाय, रा.मु/पो. शेलघर, ता.पनेवल, जि.रायगड, २) रोहित सुधाकर कातकरी, वय २० वर्षे, धंदा– मजुरी, रा.जासई, ता.उरण, जि.रायगड, ३) गोविंद हरीचंद्र वाघमारे, वय ३० वर्षे, धंदा– मजुरी, रा. जासई, ता.उरण, जि.रायगड, ४) नितीन दिलीप कातकरी, वय २० वर्षे, धंदा– मजुरी, राजासई, ता.उरण, जि.रायगड असे असल्याचे सांगितले.

नमुद इसमाच्या ताब्यात गावठी दारू तयार करण्यासाठी लागणारे साहित्य त्यामध्ये कच्या दारूचे पूर्ण भरलेले ६ पिंप प्रत्येकी २०० लिटर प्रमाणे अशी १२०० लिटर, गावठी दारू तयार करण्याचे कच्चे रसायन अंदाजे १००८००/– रूपये किंमतीचे तसेच ०५ लिटर गाळून तयार केलेली गावठी दारू मिळून आली. पोलीस पथकाने १२०० लिटर कच्ची दारू जागेवर उध्वस्त केली. ४ आरोपींविरूध्द महाराष्ट्र दारूबंदी अधिनियम १९४९ चे कलम ६५(ई), ६५(एफ) अन्वये उलवे पोलीस ठाणे येथे गुन्हा दाखल केला असुन गुन्हयाचा तपास उलवे पोलीस ठाणे करीत आहे.

सदरची उल्लेखनीय कारवाई सहाय्यक पोलीस आयुक्त, धर्मपाल बनसोडे, AHTU, गुन्हे शाखा यांचे मार्गदर्शनाखाली वपोनि/पृथ्वीराज घोरपडे, पोशि/२६५४ ठाकुर, पोशि/३०९२ चव्हाण यांनी कामगिरी केलेली आहे.

★★★★★★★★★★

